# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अलिबाग - आक्षी साखर येथील (ता.अलिबाग, जि.रायगड) खाडीतील गाळ काढणेबाबत.**

**(१) ७८१ (१५-०१-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील अलिबाग - आक्षी साखर खाडीतील गाळ काढण्याबाबत गत ३ वर्षापासून शासनाकडे संबंधीत मच्छिमार व्यवसायियिकांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आजतागायत गाळ न काढल्यामुळे मच्छिमार बोटींचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर खाडीतला गाळ काढण्याबाबत व नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) होय

(२) होय

(३) मत्स्य विकास विभागाकडून अलिबाग-आक्षी साखर खाडीतील गाळ काढण्यासाठी आवशय्क निधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला उपलब्ध करुन दिल्यानंतर सदर खाडीतील गाळ काढण्याचे काम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**सीपीआर (जि.कोल्हापूर ) रुग्णालयामध्ये अंधत्व अंपगत्वाचे बनावट दाखले तयार करुन देणारी टोळी कार्यरत असल्याबाबत**

**(२) ५४७२१ (२४-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीपीआर (जि.कोल्हापूर ) रुग्णालयामध्ये अंधत्व अंपगत्वाचे बनावट दाखले तयार करुन देणारी टोळी कार्यरत असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच टी.बी.असल्याचे बोगस प्रमाणपत्र तयार करणा-या चौघांविरोधात लक्ष्मीपुरी पोलीस स्थानकामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा क्षयरोग विभागाकडे पडताळणीसाठी आलेली चार प्रमाणपत्रे बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) होय.

सदर प्रकरणी दि.१९/०३/२०१६ रोजी लक्ष्मीपूरी पोलीस स्टेशन येथे ८ आरोपींविरुध्द गु.र.नं.९६/२०१६ भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ४६६, ४६८, ४७१, ४७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून इतर ४ आरोपींना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

गुन्ह्याच्या तपासात आरोपींना विशेष रजा मिळविण्यासाठी टिबीची बोगस प्रमाणपत्र तयार करुन त्याचा वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**सिल्लोड-सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील पोलिस पाटील भरती प्रक्रियेत ५० हून अधिक महिला उमेदवारांना परिक्षेपासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत**

**(३) ५५८६४ (२३-१०-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड-सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील पोलिस पाटील भरती प्रक्रियेत शासन नियम डावलून ५० हून अधिक महिला उमेदवारांना परिक्षेपासून वंचित ठेवण्यात आल्याचा प्रकार माहे मार्च-२०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) या संबंधात सिल्लोड उपविभाग (जि. औरंगाबाद) मध्ये एकूण १२५ पोलीस पाटील रिक्त पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. तथापि, ५० हून अधिक महिला उमेदवारांना परिक्षेपासून वंचित ठेवल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नाही. मात्र, सिल्लोड तालुक्यातील २ महिलांनी परीक्षेस बसू न दिल्याबाबत तक्रार अर्ज सादर केले होते. परंतु त्यापैकी एक महिला अंगणवाडी सेविका असल्यामुळे व दुसऱ्या महिलेकडे आरक्षित जागेसाठी जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नव्हते त्यामुळे या महिला उमेदवारांचे पोलीस पाटील पदासाठीचे अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी (जि. कोल्हापूर) तालुक्यासाठी पोलीसांची संख्या वाढविण्याबाबत**

**(४) ५९५७३ (२५-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि. कोल्हापूर) तालुका हा डोंगराळ व दुर्गम असून १२१ गावे वाड्या-वस्त्यांसह दोन लाखांवर लोकसंख्या असलेल्या या तालुक्यातील संरक्षणाची जबाबदारी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याचा भार केवळ ५३ पोलिसांवर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पोलिस दलाची रचना १९६० च्या लोकसंख्येनुसार केलेली असून बरीच पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तालुक्यासाठी पोलीसांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) :** (१) व (२) होय.
(३) पोलीस आयुक्त, कोल्हापूर या नव्याने निर्माण करावयाच्या प्रस्तावात पोलीस स्टेशनांसाठी संख्याबळ वाढविण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**वर्सोवा (मुंबई) खाडीतील गाळ काढण्याबाबत**

**(५) ६०८९८ (२३-०८-२०१६). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा (मुंबई) खाडीतील गाळ काढण्यासंदर्भात दिनांक २६ ऑगस्ट २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अमंलबजावणी अद्याप झालेली नाही, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्सोवा खाडीतील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

वर्सोवा खाडीतील एकूण ८८०००० घनमीटर गाळ काढणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत वर्सोवा येथील गाळ काढण्याबाबत मे.समुद्रा ड्रेजिंग प्रा.लि. यांना कार्यादेश आदेश देण्यात आले असून ऑक्टोबर २०१७ मध्ये काम हाती घेण्यात येईल.

वर्सोवा बंदरातून गाळ उपसणी करण्याबाबत रु.३६.८१ कोटीचा प्रस्ताव सागरमाला योजनेअंतर्गत नौवहन मंत्रालय, केंद्र शासन यांच्याकडे ५० टक्के निधी प्राप्त करण्यासाठी दिनांक ३१.७.२०१७ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोलवी (ता.पेण, जि.रायगड) जेएसडब्ल्यु कंपनीच्या विरोधात सामाजिक व राजकीय आंदोलने करणाऱ्या कार्यकर्त्यांवर दाखल केलेले खटले काढून टाकण्याबाबत**

**(६) ७५१७८ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यु या स्टील कंपनीने उभारलेल्या बेकायदेशिर प्रकल्पामुळे बाधित मच्छिमार व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याकरीता विविध स्थानिक संघटनानी व राजकीय पक्षांनी केलेल्या अनेक आंदोलनातील कार्यकर्ते व आंदोलनकर्त्यांवर सध्या दाखल व प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीच्या विरोधात विविध मागण्या व न्याय हक्कासाठी केलेल्या सामाजिक व राजकीय आंदोलनात कोणत्याही प्रकारची सार्वजनिक मालमत्तेची व जीवीतहानी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनीच्या विरोधात सामाजिक व राजकीय आंदोलने करणाऱ्या कार्यकर्त्यांवर दाखल केलेले खटले काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वडखळ पोलीस ठाणे येथील गु.र.नं. २२/२०१४ मध्ये पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना दुखापती झालेल्या आहेत. तसेच गु.रं.नं. २३/२०१४ मध्ये खाजगी बसगाडीचे नुकसान झालेले आहे.
(३) उक्त कंपनीच्या विरोधात राजकीय व सामाजिक आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या कार्यक्षेत्राखालील विविध पोलीस ठाण्यात एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४ गुन्हयांमधील खटले निकाली निघाले आहेत व ३ गुन्हयांबाबत कार्यवाही प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घुसखोर बांगलादेशी नागरिकांना शहरात राहण्यासाठी स्थानिक नागरिकांचा आधार मिळत असल्याबाबत

**(७) ७६०५६ (२१-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांगलादेशी घुसखोर नागरिकांना शहरात राहण्यासाठी स्थानिक नागरिकांचा आधार मिळत असून मुंबई महानगरपालिकेच्या सॅपप्रणालीतील जन्म नोंदणीच्या सॅप प्रणालीत नाव अपलोड करण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मदत केल्याची बाब शिवाजीनगर पोलीसांच्या माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम ठेकेदारांना स्वस्तात मजूर उपलब्ध होत असून ठेकेदारच त्यांची झोपडपट्टीत राहण्याची सोय करतात, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५३९/२०१६, भादवि कलम.४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ सह, पारपत्र कायदा कलम १२, सह आधार कायदा कलम ३४ व ४०, सह लोकप्रतिनिधी अधिनियम कलम.३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील रेशन दुकानदारामार्फत दिले जाणारे धान्य काळया बाजारात विकणाऱ्या टोळीविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(८) ७७७७७ (२१-०४-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रेशन दुकानदारामार्फत दिले जाणारे धान्य काळया बाजारात विकणाऱ्या टोळीतील १० लोकांविरुध्द शहर पोलीसांनी संघटित गुन्हेगारी नियंत्रण (मोका) कायदयानुसार दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील मुंढवा पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयातील तीन आरोपींना अटक करुन उर्वरीत सात आरोपी फरार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वैशाली काकासाहेब कांबळे या कल्याणी महिला बचत गट, स्वस्त धान्य दुकान चालवित असून त्यांनी सदर दुकानामध्ये गहू व तांदूळ हे अन्नधान्य रेशनकार्डधारक लाभार्थी नागरीकांना वितरीत न करता सदर धान्याचा काळाबाजार करुन विक्री करीत होत्या. त्याबाबतची तक्रार श्रीमती अनिता वसंत शिनगारे, पुरवठा विभाग, परिमंडळ कार्यालय, ब विभाग, पुणे यांनी मुंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २३५/२०१६ नुसार दाखल केली. या तक्रारीच्या अनुषंगाने अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ अन्वये दिनांक २६.१०.२०१६ रोजी गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात १० आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यापैकी एका आरोपीस एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्यात आले असून ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित फरार आरोपीचा शोध चालू आहे.

गुन्हयांच्या तपासात वरील आरोपींनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ (मोका) ३ (१) (२), ३ (२), ३ (४) प्रमाणे दिनांक २७.१२.२०१६ रोजी अंतर्भाव करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) येथे अपहरण, खंडणी आणि दरोडयाच्या गुन्हयांमध्ये अलिबाग पोलीस स्थानकातील पोलीस दोषी आढळून आल्याबाबत**

**(९) ७८८९१ (२१-०४-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) येथे अपहरण, खंडणी आणि दरोडयाच्या गुन्हयांमध्ये अलिबाग पोलीस स्थानकातील तीन पोलीसांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दरोडयात दोषी आढळून आलेल्या पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :** (१) अलिबाग (जि.रायगड) येथे अपहरण, खंडणी आणि दरोड्यांच्या गुन्हयांमध्ये पोलीस मुख्यालय, अलिबाग येथे नेमणुकीस असलेल्या चार पोलीसांना अटक करण्यात आली आहे.
(२) सदर प्रकरणी पोलीस मुख्यालय, अलिबाग येथे नेमणुकीस असलेले ४ पोलीस व इतर ६ आरोपी असे मिळून एकूण १० आरोपीविरुध्द अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.०२/२०१७ भादंविसं कलम ३९५, ३६४(अ),१२०(ब), १६६, ४१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील १० आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निंभोरा बोडखा (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथे दारुबंदी असताना दारु विक्री होत असल्याबाबत**

**(१०) ८१८०७ (२०-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निंभोरा बोडखा (ता. धामणगाव रेल्वे, जि.अमरावती ) येथे दारुबंदी असताना सर्रास दारु विक्री करणारे व धमकी देवून गावात दहशत निर्माण करणाऱ्यां दोषींवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधींनी जिल्हा पोलीस अधिक्षक (ग्रा.) अमरावती यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :** (१) हे खरे आहे. दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी सरपंच ग्रामपंचायत बोडखा यांनी ठाणेदार मंगरुळ दस्तगीर यांचे नावे दिलेल्या निवेदनाची प्रत पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रा.) येथे दिली होती
(२) ग्राम निंभोरा बोडखा येथील अवैध दारु व्यवसाय करणाऱ्या ३ आरोपींविरुध्द एकूण ७ केसेस दाखल करण्यात आल्या असून एका आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम १०७, ११६ जाफौ. प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.
तसेच पोलीस स्टेशन मंगरुळ दस्तगीर हद्दीत अवैध दारुविक्री करणाऱ्यांवर वेळोवेळी छापे टाकून दारुबंदी कायद्यांर्तगत ५२ केसेस करण्यात आल्या असून एकूण रु.७,९५,८०६/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच ४२ आरोपींना या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. जिल्ह्यात अवैध दारु व्यवसाय चालणार नाही याबाबत योग्य दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील औद्योगीक प्रशिक्षण संस्थामध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत

**(११) ८४८७० (१३-०९-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथे इंदिरा औद्योगीक प्रशिक्षण संस्था तुकूम, पिल्लई औद्योगीक प्रशिक्षण संस्था चंद्रपूर, ताराशक्ती औद्योगीक प्रशिक्षण संस्था चंद्रपूर, श्री साई औद्योगीक प्रशिक्षण संस्था या चार संस्थाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आल्या असता मोठया प्रमाणात गैरप्रकार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री साई औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील परीक्षा केंद्रावर झालेल्या गैरप्रकाराची जिल्हाधिका-यांनी गठीत केलेल्या समितीने चौकशी करून आपला अहवाल जिल्हाधिका-यांना दिला असुन या परीक्षांमध्ये गैरप्रकार झाला असल्याने संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी कारवाई करून परीक्षा केंद्र रद्द करण्याची शिफारस असूनही अद्यापही या प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची माहिती माहे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरप्रकारात सामिल असलेल्या अधिकारी आणि कर्मचा-यांना वाचविण्यासाठी दबावतंत्राचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषीं असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :**

(१) होय हे खरे आहे. अशा प्रकारचा गैरप्रकार झाल्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई यांना कळविले आहे.

(२) जुलै २०१७ च्या परीक्षेपासून सदरचे परीक्षा केंद्र रद्द करण्यात आले असून सदरची संस्था व त्यास जोडलेल्या संस्था अन्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील परीक्षा केंद्रांना जोडण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) होय, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली आहे.

(५) व (६) सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचेकडून नुकताच संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राप्त झाला असून, सदर अहवालात जे दोषी आढळून येतील त्यांचेवर नियमानुसार पुढील कार्यवाही संचालनालयाचे स्तरावर करण्यात येईल.

---

**खालापूर (जि. रायगड) तालुक्यातील शिरवली नदीच्या बंधाऱ्यात दोन महिला व तीन मुले बुडाल्याच्या घटनेबाबत**

**(१२) ८४८८१ (०४-०९-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि. रायगड) तालुक्यातील शिरवली नदीच्या बंधाऱ्यात कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन महिला व तीन मुले बुडाल्याची घटना दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. सदर घटना दिनांक ७ जून, २०१७ रोजी घडली आहे.

(२) व (३) शिरवली (ता.खालापूर) गांवाचे हददीतील दोन महिला (वय वर्षे सुमारे ३५ व ३० वर्षे) तीन मुलांसह ( वय वर्ष सुमारे ११ वर्षे, ७ वर्षे व ७ वर्षे) (सर्व रा.शिरवली) बाळगंगा नदीच्या बंधाऱ्यावर कपडे धुण्याकरीता गेल्या होत्या. त्यावेळी तीन्ही मुले पाण्यात खेळत असतांना खडकावरील शेवाळावरुन पाय घसरुन पाण्यात पडले असता त्यांना वाचविण्यासाठी दोन्ही महिला पाण्यात उतरल्या. मात्र पाचही जण पाण्यात बुडाले. गांवकऱ्यांना सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी बुडालेल्यांना पाण्यातून शोधून बाहेर काढले असता ते मृत झाल्याचे आढळून आले. त्यांना तातडीने रुग्णवाहिकेतून प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे आणले असता तेथील डॉक्टरांनी तपासून त्यांना मयत घोषित केले.

याप्रकरणी खालापूर पोलीस ठाणे येथे अ.मृ. रजि.नं.१७/२०१७ सी.आर.पी.सी. १७४ अन्वये दिनांक ०७.०६.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. मयतांचे पोस्टमार्टम करण्यांत आले असून ईन्क्वेस्ट पंचनामा झाला आहे. या प्रकरणी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले असून प्रकरणाचा पुढील तपास चालू आहे.

(४) या प्रकरणी कार्यवाही करण्यात कोणत्याही प्रकारे विलंब झालेला नाही.

---

## मुंबईतील वाढत्या सामूहिक बलात्काराच्या घटनांबाबत

**(१३) ८४९७५ (०४-०९-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक १ एप्रिल २०१६ ते ३० मार्च २०१७ पर्यंत सामूहिक बलात्काराचे एकूण ११ गुन्हे दाखल झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत महिलांच्या सुरक्षतेचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील वाढत्या सामूहिक बलात्काराच्या चिंताजनक बाबीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१७) :** (१) हे, खरे आहे.

(२) व (३) महिला व मुली यांच्यावरील अत्याचाराबाबतची प्रकरणे अतिशय संवेदनशिल प्रमाणे हाताळली जाऊन आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केली जातात.आरोपीना कठोर शिक्षा व्हावी यासाठी सर्वतोपरी प्रयन्त केले जातात.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालया मार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढील प्रमाणे आहे.

* पोलीस दीदी योजने मार्फत शाळा व परिसरातील मुलांना अनोळखी व्यक्तीबाबत दक्षता घेण्याचे मार्गदर्शन करतात.

शाळेमध्ये विद्याथ्यार्ना बॅड टच व गुड टच बाबत मार्गदर्शन केले जाते.

* मोहल्ला कमिटीतील पोलीस मित्र सभासद यांचे बैठका घेऊन मुलांना बाहेर सोडू नये,अनोळखी,संशयीत वाटल्यास पोलीसांना खबर देणे अश्या सूचना देण्यात येतात.

* पोलीस ठाणे हद्दीत बिनतारी संदेश वाहन बीट अधिकारी यांचेमार्फत गस्त घालण्यात येते.

* महिला कक्षाची स्थापना केली आहे.

* महिला दक्षता कमिटी स्थापन करण्यात आली आहे.

* महिला छेडछाड विरोधी पथके तयार करण्यात आली आहे.

* ९४ महिला व बाल सुरक्षा गस्त पथके तयार करण्यात आली आहे.

* १०२ महिला बीट मार्शल मोटार सायकल वाहनासह नेमण्यात आले आहे.

* विशेष हेल्पलाईन १००,१०३, व १०९० सूरू करण्यात आली आहेत.

* पोस्को कायदाप्रमाणे कठोर कारवाई करण्यात येते.

* निर्मनुष्य जागेच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे,प्रकाश व्यवस्था करण्याचे उपाययोजना राबविण्यात येते..

(४) प्रश्न उपस्थित होत नाही.

---

**राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत**

**(१४) ८५२११ (०४-०९-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनक अभ्यासक्रमातील पदवी किंवा अगदी पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणारे ५० टक्क्यांहून अधिक विद्यार्थी नोकरीविना राहिले असल्याची गंभीर माहिती माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्याकरिता शासनाने राज्यात उद्योग निर्मितीकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे संगणकीकरण, ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार माहिती व मार्गदर्शन प्रशिक्षण केंद्र, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान तसेच पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना, सुधारित बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना या योजना राबविण्यात येतात

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचवटी (जि.नाशिक) येथील गोदावरी चेंबरमधील अग्रवाल असोसिएशनवर बनावट कागदपत्रे प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत**

**(१५) ८५२४१ (०४-०९-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचवटी (जि.नाशिक) नाशिक शहर भागातील पंचवटी कॉलेज समोरील गोदावरी चेंबरमध्ये अग्रवाल असोसिएशन यांच्या कार्यालयावर महसूल विभागाच्या अधिकारी व पंचवटी पोलीसांनी टाकलेल्या संयुक्त छाप्यामध्ये श्री. हरिश्चंद्र अगरवाल व श्री. प्रमोद नार्वेकर हे दोघे बनावट रेशनकार्ड तसेच अनेक शासकीय बनावट दस्तावेज तयार करीत असल्याचे निदर्शनास आले असून त्यांच्याविरोधात पंचवटी पो. ठाण्यात दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त छापा घातल्यानंतर पंचवटी पो. ठाण्यात एफआयआर त्याच दिवशी दाखल न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ,

(३) असल्यास, या बनावट कागदपत्रांच्या प्रकरणी अग्रवाल असोसिएशन समवेत काम करणा-या रॅकेटमध्ये अन्य किती व्यक्तींचा सहभाग होता, या प्रकरणी फरार असलेल्या संशयीताला अटक करण्यात आली आहे काय, तसेच या सर्व प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(४) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :**(१), (२), (३) व (४)

गोदावरी चेंबर मध्ये अग्रवाल असोशिएशन यांच्या कार्यालयावर महसुल विभागाच्या अधिकारी व पोलिसांनी दि.१०/०४/२०१७ रोजी टाकलेल्या संयुक्त छाप्यामध्ये श्री. हरिश्चंद्र अगरवाल व श्री. प्रमोद नार्वेकर हे शासकीय बनावट दस्तावेज तयार करीत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यांच्या विरुध्द त्याचदिवशी म्हणजेच दि.१०/०४/२०१६ रोजी पंचवटी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४३/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४५६, ४६६, ४६८, ४७३ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात हरीश्चंद्र अग्रवाल यांच्या समवेत अन्य ४ व्यक्तींचा समावेश असुन त्यातील ३ व्यक्तींना अटक करण्यात आलेली असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात गत ३ वर्षात बेरोजगारांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले असल्याबाबत**

**(१६) ८५२५२ (०४-०९-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत ३ वर्षात बेरोजगारांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षित विद्यार्थ्यांना वेळेवर रोजगार मिळत नसून, राज्यातील अनेक शासकीय विभागात मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्यास शासन दिरंगाई करीत असून सदर पदे तात्काळ भरुन बेरोजगारांना रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

राज्यात गत ३ वर्षात बेरोजगारांचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात वाढले असल्याचे अनुषंगाने कोणतेही निवेदन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाकडे प्राप्त झालेले नाही. माहे मे, २०१७ अखेरपर्यंत राज्यात एकूण ४४,४०,०६४ इतक्या उमेदवारांची नोंद केंद्रात झालेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

गत ३ वर्षात शासकीय कार्यालयातील रिक्त पदांच्या संख्येत फार मोठी वाढ झाली असल्याचे आढळून आले आहे.

(३) हे खरे नाही. पदोन्नतीच्या कोटयाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणतेही निर्बंध नसून, सरळसेवेने पदभरतीसंदर्भात शासनाने अंशत: निर्बंध आणले असले तरी विहित मर्यादेपेक्षा जास्त पदे भरावयाची असल्यास, अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून परवानगी दिली जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देखिल भरतीप्रक्रीया चालू असून, सेवानिवृत्ती मृत्यू व इत्यादी कारणांमुळे पदे रिक्त होणे व अशी पदे विहित पध्दतीनुसार भरली जाणे ही निरंतर चालणारी प्रक्रीया आहे.

राज्यातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि इच्छूकांना स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत रोजगार मेळावे, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान इ.योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे एकत्रित स्वतंत्र महामार्ग सुरक्षा पथक व पोलीस अधिक्षक महामार्ग सुरक्षा कार्यालय स्थापन करण्याबाबत**

**(१७) ८५४३८ (०४-०९-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे एकत्रित स्वतंत्र महामार्ग सुरक्षा पथक व पोलीस अधिक्षक महामार्ग सुरक्षा कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर(जि. ठाणे ) येथील कॅम्प नं. ५ मधील महात्मा फुले नगरमधील लहान मुलांना दुकानदाराने केलेली मारहाण**

**(१८) ८५४९२ (०४-०९-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि. ठाणे ) येथील कॅम्प नं. ५ मधील प्रेमनगर टेकडी भागातील महात्मा फुले नगरमध्ये दिनांक २१ मे २०१७ रोजी वा त्यासुमारास २ लहान मुलांनी एका दुकानदाराच्या दुकानातील बरणीतून चकली चोरुन खाल्ल्याचा राग अल्याने दुकानदार मेहमुद जुबेला पठाण व त्यांची दोन मुले इरफान व सलिम पठाण यांनी या दोन लहान मूलांना प्रचंड मारहाण करुन त्यांना अर्धनग्न करुन केसाचे अर्धे मुंडण करुन, त्यांच्या गळयात चपलांचा हार घालून त्यांची धिंड काढल्या प्रकरणी त्या मुलांचे पालक व रहिवाशांनी हिल लाईन पो. ठाण्यात तक्रार दाखल केल्याची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय, .

(२) असल्यास, या प्रकरणी पोलीसांनी या तिन्ही आरोपींविरोधात कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदवला असून या संपूर्ण प्रकरणाचा तपास पूर्ण केला आहे काय,

(३) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक २०/५/२०१७ रोजी हिललाईन पे स्टे येथे तिन्ही आरोपी विरूध्द गु र नं १२४/२०१७ भा द वि कलम ३५५,५००,३२३,५०४,३४ सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८९ चे कलम ३(१) (ड)(ई)(आर),सह पोस्को कलम ११(२), १२ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६७(अ)(ब) सह ज्युवेनायल जस्टीस ॲक्ट २०१५ चे कलम ७५ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) दिनांक २०/५/२०१७ रोजी गुन्ह्यातील ३ आरोपीस अटक करण्यात येऊन ते न्यायालयीन कोठडीत आहे. तसेच,सदरच्या गुन्ह्यामध्ये आरोपी विरूध्द दिनांक १८/७/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## नागपूर (जि.नागपूर) शहरात वाढलेले अपघाताचे प्रमाण

**(१९) ८५६६४ (०४-०९-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) शहरात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ मार्च २०१७ या तीन महीन्याच्या कालावधीत एकूण ३३१ अपघात झाले असून त्यात ५८ जणांचा मृत्यू तर ३४८ जण जखमी झाल्याची गंभीर बाब माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१२ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत नागपूर शहरात ६४५६ अपघात झाले ज्यातील १४३४ अपघात प्राणांतिक ठरले तर २३७४ अपघात गंभीर स्वरूपाचे होते यात १४९९ नागरीकांचा बळी गेला तर ६३९५ नागरीक जखमी झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक दुचाकी, ऑटोरिक्षा, कार, ट्रक मेटॅडोर बस अशा वाहनांच्या गती मर्यादेवर तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वहन केल्यामुळे व नियंत्रण नसल्यामुळे ती वाहने प्राणांतिक अपघातास कारणीभूत ठरलेले आहेत, हे ही खरे आहेत काय,
(४) असल्यास, अशा वाहनाच्या वेगावर नियंत्रण तसेच प्रवासी वाहनावर अंकूश लावण्याकरीता शासनाने कोणती कायदेशीर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
दिनांक १ जानेवारी, २०१२ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीत नागपूर शहरात ६,१८० अपघात झाले असून त्यात १,४९९ जणांचा मृत्यु झाला तर ६,३९५ नागरीक जखमी झाले आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) अपघातांना आळा बसावा याकरीता वाहतूक पोलीस विभागाकडून नागपूर शहरात वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्याकरीता महत्वाच्या चौकात वाहतूक पोलीसांची नेमणूक करण्यांत येते. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुध्द मोटार वाहन अधिनियमान्वये नियमीतपणे कारवाई करण्यांत येते. सन २०१२ ते ऑगस्ट, २०१७ पर्यंत मो.वा.का. अन्वये खालीलप्रमाणे कारवाई करण्यांत आलेली आहे.

| सन | दाखल केसेस |
|---|---|
| २०१२ | ३,१५,६२२ |
| २०१३ | २,८५,४८५ |
| २०१४ | २,८१,५८० |
| २०१५ | ३,५६,८४५ |
| २०१६ | ५,१५,३७० |
| २०१७ (ऑगस्ट पर्यंत) | ४,५३,६६६ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूरात सुरू करण्याबाबत**

**(२०) ८६१७६ (०४-०९-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्य न्यायमूर्तींना आठ दिवसांत पत्र पाठवून मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापण्यातील अडथळे दूर करण्याची ग्वाही मा. मुख्यमंत्री यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे कृती समितीने पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व कोल्हापूर येथे खंडपीठ स्थापण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) मा. उच्च न्यायालयाचे कोल्हापूर येथील खंडपीठाच्या निर्मितीसाठी मा. उच्च न्यायालयास लवकरच पत्र पाठविणार असल्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदय यांनी कोल्हापूर येथील शिष्टमंडळ आणि खंडपीठ कृती समितीच्या सदस्यांच्या विधानभवन, मुंबई येथील दि. ५/०४/२०१७ रोजीच्या भेटी दरम्यान केली आहे.

(२) कृती समितीचे पुन्हा आंदोलन करणेबाबतचे कोणतेही निवेदन अथवा इशारा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(३) राज्य मंत्रीमंडळाने दि. १२/०५/२०१५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यात यावे तसेच पुणे येथे अशा प्रकारचे फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा, अशी शिफारस शासनाने मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दि. १७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. यानुषंगाने पुढील कार्यवाही उच्च न्यायालय, मुंबई व केंद्र शासन यांच्यास्तरावरून अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस शासनाने दिलेली अनुदान**

**(२१) ८६६९३ (२४-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस शासनाने एक हजार कोटी रूपयाचे अनुदान दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीपर्यंत दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक हजार कोटी रूपयाच्या अनुदानापैकी दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीपर्यंत किती कोटीं रूपयांचे अनुदान विकास कामांवर खर्च झाले आहेत,
(३) असल्यास, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी अंतर्गत तीन ग्रिन फिल्ड, सहा ब्राऊन फिल्ड विमानतळ आणि गडचिरोली येथे हेलिपार्ट विकसीत करण्याचे काम अंतर्भुत होते त्यापैकी किती प्रकल्प पूर्ण झाले आहेत,
(४) असल्यास सदरहू विकास कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१७) :**(१) व (२) नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस शासनाकडून रु.१०८९ कोटी इतके अनुदान देण्यात आले असून त्यापैकी मिहान प्रकल्पाचा विकास, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तसेच प्रकल्पग्रस्तांना पायाभूत सुविधा पुरविणे यांवर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने रु.१०३२ कोटी इतका खर्च केलेला आहे.
(३) (४) व (५) राज्यातील ३ ग्रीनफील्ड व ५ ब्राऊनफील्ड विमानतळांचा विकास करण्याचे काम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत सुरु असून त्यापैकी शिर्डी विमानतळ प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले आहे व तेथून विमानसेवा सुरु करण्यात आली आहे.

---

**राज्य शासनाने राष्ट्र पुरुष, थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास परवानगी देण्यासाठी केलेल्या मार्गदर्शक तत्वांबाबत**

**(२२) ८६७१६ (२४-०८-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वांबाबत दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय घेण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये क्र. ६ च्या मुद्द्यामध्ये पुतळा उभारण्यासाठी अल्प संख्यांक व स्थानिकांची ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रपुरुष तसेच विविध जाती व धर्माच्या थोर व्यक्तींचा पुतळा उभारण्यासाठी अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याने जातीय व धर्मीय तणाव निर्माण होऊ शकतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे, सदर मार्गदर्शक तत्वांचा पुनर्विचार करून निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१७) :** (१) व (२) होय.
(३) अंशतः खरे आहे.
(४) सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्व क्र. ६ पुढीलप्रमाणे सुधारण्यात आले आहे.
"पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याबाबत सविस्तर चौकशी करुन संबंधित पोलीस कार्यालय प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठी स्थानिक लोकांचा विरोध नसल्याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेण्यात यावा."
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगरवरुन कोल्हापूरात पैलवानकी करण्यासाठी आलेल्या सात वर्षाच्या शाळकरी मुलास झालेली अमानुष मारहाण केल्याबाबत

**(२३) ८६९०२ (०४-०९-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगरवरुन कोल्हापूरात पैलवानकी करण्यासाठी आलेल्या सात वर्षाच्या शाळकरी मुलास दोघा भावांनी अमानुष मारहाण केल्याचा प्रकार दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित मुलाला बेदम मारहाण करुन गरम गॅसवर बसविणे, गुप्त अंगावर चटके देणे, गरम पाणी ओतणे इत्यादी प्रकारचा अमानुष छळ केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून जुनाराजवाडा पोलीस ठाणे येथे ३ आरोपी विरूध्द गुरनं १२५/२०१७ भा द वि स कलम ३२४,३२६,५०४,३४ सह ८,१०,१२ पोक्सो कायदा २०१२ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या विरूध्द सबळ पुरावा प्राप्त झाल्याने आरोपीच्या विरूध्द मा. बालन्यायमंडळात दिनांक ३०/१०/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) येथील विमानतळाच्या विकास कामाबाबत**

**(२४) ८७६४८ (०४-०९-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) येथील विमानतळाची धावपट्टी रिलायन्स कंपनीला देखभाल व दुरुस्तीसाठी करारावर देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करारानुसार सदर कंपनीने विमानतळ व धावपट्टीवर कोणत्या सुविधा पुरविल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-११-२०१७) :** (१) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लातूर यांचे दि.३/११/२००९ रोजीचे पत्रान्वये करारनामा करण्यात येऊन रिलायन्स कंपनी अंतर्गत असलेल्या मे.उस्मानाबाद एअरपोर्ट प्रा.लि. यांना उस्मानाबाद विमानतळाचे हस्तांतरण करण्यात आले आहे.

(२) सदर कंपनीमार्फत उस्मानाबाद विमानतळावर करारनाम्यातील शेड्युल-३ मधील Non-Airport Activity तरतुदीनुसार फ्लाईंग ॲकेडमी उभारण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच, कंपनीमार्फत विमानतळावर खाजगी सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात १ लाख लोकांच्या रक्षणासाठी केवळ १६८ पोलिस कार्यरत असल्याबाबत**

**(२५) ८७९७० (०४-०९-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची १२ कोटी लोकसंख्या असूनही १ लाख लोकांच्या रक्षणासाठी केवळ १६८ पोलिस कार्यरत असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार राज्यात कायदा व सूरक्षा राखणाऱ्या पोलिसांच्या संख्येत वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) राज्याची लोकसंख्या विचारात घेता राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची विविध संवर्गातील एकुण ६१४९४ पदे पाच टप्प्यामध्ये निर्माण करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पदनिर्मितीच्या पाच टप्प्याचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये विविध शासन निर्णयांन्वये एकुण १२२९७ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये १२५४९ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता त्यावर वित्त विभागाने त्यांच्या दिनांक २५.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार पोलीस दलाचा आकृतीबंध निश्चित करुन प्रस्ताव फेरसादर करावा असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे (जि.धुळे) शहरात सन २०१३ साली झालेल्या जातीय दंगलीची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या चांदीवाल कमिशनचा अहवालाबाबत

**(२६) ८८०८९ (०४-०९-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे (जि.धुळे) शहरात दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास जातीय दंगल झाली असुन सदर दंगलीत ६ मुस्लीम युवक पोलीसांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडले असुन ३० पेक्षा अधिक मुस्लीम युवक जखमी झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दंगलीची चौकशी करण्याकरिता शासनाने चांदीवाल कमिशन नेमले असुन या कमिशनचा अहवाल अद्यापही प्राप्त झाला नसून दोषींवर कारवाईही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कारवाई होण्याकरिता आवश्यक असलेला चांदीवाल कमिशनचा अहवाल तातडीने प्राप्त करुन घेण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :** (१) व (२) श्री. चांदीवाल समितीचा अहवाल दि.२९.११.२०१६ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिह्यातील हिंगणघाट शहरातील श्री छत्रपती शिवाजी मार्केड यार्ड (इंदिरा नगर) व मौजा मांडगाव (ता.समुद्रपूर) येथे पोलीस चौकीस मंजुरी मिळणेबाबत**

**(२७) ८८५१५ (०४-०९-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिह्यातील हिंगणघाट शहरातील श्री छत्रपती शिवाजी मार्केड यार्ड (इंदिरा नगर) व मौजा मांडगाव (ता. समुद्रपूर) येथे पोलीस चौकीस मंजुरी मिळणेबाबत चे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनास सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील अर्धी वस्ती याच परिसरात वास्तव्यास असून या ठिकाणी गुन्हयाचे प्रमाण वाढल्याने स्थानिक रहिवाशांनी पोलीस चौकी सुरु करण्याची मागणी केल्यामुळे शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी,२०१६ रोजी वा त्यासुमारास स्थानिक पोलीस प्रशासनास या बाबतच्या कार्यवाहीसाठी निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगणघाट शहरातील श्री छत्रपती शिवाजी मार्केड यार्ड ( इंदिरा नगर) व मौजा मांडगाव ता. समुद्रपूर या ठिकाणी नवीन पोलीस चौकीस मंजुरी मिळणेबाबतची कार्यवाही स्थानिक प्रशासनाकडून न झाल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ठिकाणी पोलीस चौकी सुरु करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) हिंगणघाट येथील शिवाजी मार्केट यार्डचे अंतर पोलीस स्टेशनपासून २ कि.मी. वर असल्यामुळे तेथे पोलीस चौकीची आवश्यकता नसल्याचे आणि मौजा मांडगाव बीटमधील मागील ३ वर्षाच्या गुन्हयांची सरासरी पाहता सन १९६० च्या प्रमाणकानुसार २५ पेक्षा कमी असून आणि वित्त विभाग, शासन निर्णय दि.०२.०६.२०१५ अन्वये वेतनावरील खर्च नियंत्रित

करण्यासाठी नवीन पदनिर्मिती बंद असल्यामुळे मौजा मांडगाव ता.समुद्रपूर येथे पोलीस चौकी देय नसल्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.२४.०६.२०१५ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

---

**तासगाव (जि. सांगली) येथील द्राक्ष व्यापा-याने शेतक-यांची केलेली फसवणूक**

**(२८) ८८५८३ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव (जि. सांगली) येथील विनायक तुळशीराम शिंदे या द्राक्ष व्यापा-याविरुद्ध तासगांवसह वासुंबे, बोरगांव, कोलगे येथील शेतक-यांची एकूण २२ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणीची तक्रार दिनांक १५ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर व्यापा-याविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :**(१), (२) व (३) होय, सदर द्राक्ष व्यापाऱ्याने फिर्यादी व इतर ७ शेतकऱ्यांची द्राक्ष खरेदी करुन त्यांना पैसे परत न करता एकुण २१,९२,७४०/ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तासगाव पोलीस स्टेशन, सांगली येथे गु.र.नं. ९५/२०१७ (सी.सी.टी.एन.एस.नं.१८५/२०१७) भा.दं.वि. कलम ४२० प्रमाणे २ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील एका आरोपीस दि.१३/०५/२०१७ रोजी अटक करुन दि.२२/०५/२०१७ पर्यत पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे. अटक आरोपीविरुध्द दोषारोपपत्र पाठविण्याची कार्यवाही चालु असुन इतर १ आरोपीविरुध्द पुरावा हस्तगत करण्यावर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

---

**जाडरबोबलाद व सोन्याळ (ता. जत, जि. सांगली) येथील डाळींब व्यापा-यांची परप्रांतीय व्यापा-यांकडून फसवणूक झाल्याबाबत**

**(२९) ८८६६५ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाडरबोबलाद व सोन्याळ (ता. जत, जि. सांगली) येथील अनेक डाळींब व्यापा-यांची परप्रांतीय डाळींब व्यापा-यांकडून सुमारे ७० लाखांची फसवणूक झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर परप्रांतीय व्यापा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :** (१) उमदी पोलीस ठाणे येथे प्राप्त झालेल्या फिर्यादीनुसार परप्रांतीय डाळींब व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची रुपये ११,९१,२००/- एवढया रकमेची फसवणुक केली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२), (३) व (४) होय. सदर प्रकरणी उमदी पोलीस ठाणे येथे संबधीत व्यापाऱ्यांविरुध्द गुन्हा क्र. १७/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद घेण्यात आली आहे. तसेच गुन्ह्याची चौकशी करुन २ आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र पाठवण्यात आले असुन फरारी असलेल्या एका आरोपीचा शोध घेण्याची कारवाई करण्यात येत आहे. अटक आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असुन त्यांना अद्याप जामीन मंजूर झालेला नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) पोलीसांकरवी तातडीने तपासकार्य व अन्य तत्सम कार्यवाही केलेली आहे.

---

**शासनाच्या विरोधात आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांवरील खटले मागे घेण्याबाबत**

**(३०) ८८७२० (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक हिताच्या प्रश्नांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांवरील दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी पूर्वीचे खटले मागे घेण्याचा निर्णय तत्वत: मान्य करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजकीय आंदोलनातील खटल्यांचा आढावा घेण्यासाठी महानगरात पोलीस आयुक्त व जिल्हास्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समित्यांनी कोणकोणते खटले मागे घेण्याबाबत राज्यस्तरीय समितीकडे शिफारस केली आहे,
(४) असल्यास, शासनाने राज्यस्तरीय समितीने शिफारस केलेले खटले मागे घेण्याबाबत मा.न्यायालयास विनंती करून अद्यापपर्यंत त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीआरओ-०५१६/ प्र.क्र.१०६/विशा-२, दि. ३०.८.२०१६ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार राजकीय व सामाजिक

आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत मा.अध्यक्ष, मंत्रिमंडळ उपसमिती तथा मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या आज पर्यंत झालेल्या बैठकीत ३८ प्रकरणे ठेवण्यात आली असून १४ प्रकरणांमध्ये गुन्हा मागे घेण्यासाठी कोर्टाची अनुमती मागविण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. तर २४ प्रकरणांमध्ये गुन्हे मागे घेण्याबाबत मान्यता नाकारण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील व्हिसेरा प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ८८७७३ (०४-०९-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशननिहाय मिळालेल्या माहितीवरुन अपघाती मृत्यू प्रकरणी एकूण ६९७ व्हिसेरा प्रकरणे प्रंलबित असल्याचे माहे मे २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे दिवठाणा (ता.चिखली, जि.बुलढाणा ) येथील भरतसिंग इंगळे यांचा दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास अपघाती मृत्यू झाल्यामुळे व्हिसेरा रिपोर्ट मिळविण्यासाठी पो.स्टे चिखली यांनी प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१६ पासून एक वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही व्हिसेरा रिपोर्ट न मिळाल्याने त्यांचा गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्याचा दावा नाकारला गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा औरंगाबाद यांच्याकडून सर्व प्रलंबित व्हिसेरा प्रकरणे मार्गी लावण्याकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) तसेच, सदर अपघातग्रस्त शेतकरी कुटूंबांला सदर विम्याचा खासबाब म्हणून लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,औरंगाबाद येथे पोलीस ठाणे चिखली यांचे व्दारे दिनांक १७.२.२०१६ रोजी व्हिसेरा दाखल करण्यात आला होता.सदर व्हिसेरा तपासणी करून प्रयोगशाळेने दि.२४.०७.२०१७ रोजी विश्लेषण अहवाल सादर केला. तद्नंतर सदर अहवाल प्राप्त झाल्यावर विमा कंपनीने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्याचा दावा मंजूर केलेला आहे.

(४) संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील विविध प्रयोगशाळांमधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी रिक्त असलेल्या एकूण ६५० पदांवर करार पध्दतीने अधिकारी /कर्मचारी घेण्याबाबत दि.२३.०८.२०१७ व १६.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली असून करार पद्धतीने पदे भरण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे.
त्याच प्रमाणे संचालनालयाकडे नियमित मंजूर असलेली रिक्त पदे भरणेबाबतही कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,औरंगाबाद यांच्याकडून याप्रकरणातील व्हिसेराचा विश्लेषण अहवाल विमा कंपनीस सादर केल्या नंतर विमा कंपनीने दि.०५/०९/२०१७ रोजी सदर शेतकरी कुटुंबाचा विमा दावा मंजुर केलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) शहरातील अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीची समस्या निर्माण झाल्याबाबत**

**(३२) *८८८५५* (०४-०९-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) शहरातील अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून वाहतुकीचे नियम कोणीही पाळत नसल्याने नागरीकांना चालणेही कठीण होवून बसले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कर्जत पोलीसांकडे तेथील लोकप्रतिनिधींनी तसेच जेष्ठ नागरीकांनी तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने वाहतुकीची समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

कर्जत शहरात नगर परिषद असून अद्यापही आठवडी बाजार भरवण्यांत येतो. त्यामुळे फक्त त्याच दिवशी कर्जत बाजारपेठेत वाहतूकीचा प्रश्न निर्माण होत आहे. मात्र बाजारपेठेच्या दिवशी त्या ठिकाणी वाहनांना प्रवेशबंदी करुन वाहतूक नियमनासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यांत येते.

कर्जत शहरामध्ये वाहतूक सुरळीत रहावी याकरीता पी-१, पी-२ चे फलक लावण्यांत आले आहेत. याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पोलीस तसेच नगरपरिषदेच्या आदेशान्वये टोईंगद्वारे कारवाई केली जाते. याकरीता एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज नेमणूक केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) येथील शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थातील बिल्डिंग टेक्नॉलॉजी विषयाचा अभ्यासक्रम बंद असल्याबाबत**

**(३३) ८८९९७ (०४-०९-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थातील (आयटीआय) बिल्डिंग टेक्नॉलॉजी विषयाचा अभ्यासक्रम हा मागील ८ ते १० वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे मुख्याध्यापक, शिक्षकासह इतर पदांसाठी मंजूर २३ पदांपैकी एकुण १३ पदे रिक्त असल्यामुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथे बिल्डिंग टेक्नॉलॉजी विषय पुन्हा सुरु करुन येथील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

"बिल्डिंग टेक्नॉलॉजी" हा व्यवसाय अभ्यासक्रम औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये राबविण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळमनूरी या संस्थेंतर्गत १७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ०८ पदे भरलेली असून ०९ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली (जि.हिंगोली) पंचायत समितीच्या गोदामातील साहित्य व औजारे कमी प्रमाणात आढळून आल्याबाबत**

**(३४) ८९००१ (०४-०९-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) पंचायत समितीच्या गोदामात विविध विभागाचे साहित्य व औजारे साठविले जात असताना माहे जुलै ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीतील शिल्लक साहित्याचा पंचनामा केला असता त्यात शासकीय साहित्य व औजारे कमी प्रमाणात आढळून आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर अपहार प्रकरणी पोलीसात गुन्हा नोंद होऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणातील संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) पंचायत समिती हिंगोली येथील शासकीय गोदामाचे कुलूप तोडून गोदामातील कृषी विभागाकडून लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणारे एकुण ५,१८,९८८/ रुपये किंमतीचे साहित्य / अवजारे चोरीला गेल्याप्रकरणी पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु.र.नं. १५४/२०१७ भा.दं.वि. कलम ४६१ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासात चोरीली गेलेल्या मुद्देमालापैंकी एकुण २,९४,७५०/ रुपये किंमतीचा मुद्देमाल बेवारस स्थितीत मिळून आल्याने जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करणे व उर्वरित मुद्देमाल जप्त करण्यावर गुन्ह्याचा तपास चालु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**ठाण्यातील बहुतांश ठिकाणी बेवारस भंगार दुचाकी व चारचाकी वाहने पडून असल्याबाबत**

**(३५) ८९६२५ (०४-०९-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्यातील बहुतांश गल्लीबोळात काही ठिकाणी बेवारस भंगार दुचाकी व चारचाकी वाहने अनेक दिवसांपासून धुळ खात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यात या भंगार गाडयांमध्ये पाणी साचून डासांच्या प्रमाणात वाढ झाली असून डेंग्यू, मलेरीया वा अन्य साथीच्या रोगांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भंगार सामान उचलण्याच्या दृष्टीने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ठाणे वाहतुक शाखेने हायड्रोलीक क्रेन नसल्याचे कारण दाखवून पदपथ मोकळा करण्यास असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने भंगार व बेवारस गाड्या उचलून पदपथ मोकळा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) हे खरे नाही. ठाणे शहरात बेवारस धुळ खात पडून असलेल्या वाहनांबाबत खबर प्राप्त झाल्यास अथवा आढळून आल्यास वाहतूक शाखेमार्फत सदर वाहने हटविण्याची कार्यवाही करण्यांत येते.
(२) पावसाळयात डासांचे प्रमाण वाढून डेंग्यू, मलेरिया व अन्य साथीचे रोग पसरु नयेत म्हणून ठाणे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी औषध फवारणी केली जाते.

(३) हे खरे नाही. शहर वाहतूक शाखेअंतर्गत उपविभागाच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत पार्किंग करण्यांत आलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी खाजगी कर्षण वाहनांची सेवा घेण्यांत आलेली आहे. वाहतूक शाखेकडे हायड्रॉलिक क्रेन नसली तरी उपलब्ध कर्षण वाहनांद्वारे दैनंदिन कायदेशीर कारवाई केली जाते.
(४) शहर वाहतूक शाखेमार्फत बेवारस वाहने हटविण्यांत येत असून अद्यापपर्यंत २० चारचाकी, २ टेम्पो, १२ रिक्षा व ३६ दुचाकी वाहने हटविण्यांत आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरखेडा, करंजखेड, (ता. दिंडोरी, जि. नाशिक) येथे**
**अवैध धंद्यात वाढ झाल्याबाबत**

**(३६) ८९७६२ (०४-०९-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरखेडा, करंजखेड, (ता. दिंडोरी, जि. नाशिक) येथे अवैध धंदे करण्याचे प्रमाण वाढले असल्याची माहिती माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर परिसरातील नागरीक, विद्यार्थी, शेतमुजर, महिला या बेकायदेशीर व्यवसायाच्या अधीन गेल्याने सर्वसामान्य नागरीकांचे संसार उध्वस्त झाल्याच्या घटनांत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त अवैध धंदे बंद करण्याकरीता ग्रामपंचायतीने लेखी स्वरुपात तक्रार दाखल करूनही स्थानिक पोलीसांनी सदरहु अवैध धंद्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अवैध धंदयाचा प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर अवैध धंदे प्रतिबंध करण्याबाबत व या अवैध धंद्याकडे दुर्लक्ष करणा-या संबधित पोलीस अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

माहे जून महिन्यात नशाबंदी कायद्याखाली करंजखेडा येथे २ गुन्हे व वरखेडा येथे १ गुन्हा दाखल आहे. अवैध धंद्यात वाढ झालेली नसून अशा प्रकारे चोरुन अवैध धंदे चालवणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवाला रॅकेटचे काम करणारा आयएसआय एजंट अल्ताफ कुरेशी यास 'एटीएस' पथकाने अटक केल्याबाबत**

**(३७) ९०४७० (०४-०९-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवाला रॅकेटचे काम करणारा आयएसआय एजंट अल्ताफ कुरेशी याला दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील नागपाडा परिसरात 'एटीएस' ने अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्ताफ कुरेशीला नागपाड्यात भाड्याने खोली देणा-या मालकासही पोलीसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार अल्ताफ कुरेशी व त्याला मदत करणा-या सहका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही .

(३) सदर गुन्हयाचा तपास उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथक करत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मागासवर्गीयांसाठी विवाहपूर्वीच्या नावाच्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत**

**(३८) ९०५४३ (१८-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मागासवर्गीयांसाठी राखीव जागावरुन निवडणूक लढवणा-या विवाहित महिलांनी विवाहपूर्वीच्या नावाच्या जातवैधता प्रमाणपत्र जोडले असल्यास खात्रीनंतर ते वैध ठरवावे असा आदेश राज्य निवडणूक आयोगाने माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान काढला आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून दि.१ एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये सर्व संबधितांना सूचित करण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोग संविधानिक व स्वायत्त असल्याने, या संदर्भात शासनास हस्तक्षेप करता येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**पंढरपूर (जि.सोलापूर ) येथील सोमाणी पेट्रोल पंप असणा-या रद्दी दुकानास आग लागून सात लाखांचे नुकसान व एकाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३९) ९१२७२ (०४-०९-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील सोमाणी पेट्रोल पंपनजीक असणा-या रद्दी दुकानास आग लागून सात लाखांचे नुकसान व एकाचा होरपळून मृत्यू झाला असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आगीच्या दुर्घटनेतील बाधितांना आर्थिक मदत देण्यासोबतच अशा दुर्देवी घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दुर्घटनेतील मयत (मूळ रा. उत्तरप्रदेश) हा मद्य व विडीचा व्यसनी होता. दिनांक २०.०५.२०१७ रोजी रात्री ०१.१५ चे सुमारास त्याने लक्ष्मी पथ, सोमाणी इंटरप्रायजेस, पंढरपूर येथे विडी ओढून विडीचे थोटूक अथवा पेटलेली काडी तेथील रददी दुकानातील इतरत्र पडलेल्या रददी सामानावर टाकल्याने आग भडकून प्राणहानी व सात लाखांचे नुकसान झाले आहे. या ठिकाणी विद्युत पुरवठा नव्हता तरीदेखील आजूबाजूच्या अंतरावर असलेल्या तारांच्या घर्षणामुळे ठिणगी पडून आग लागली किंवा कसे याबाबत विद्युत वितरण कंपनीस विचारणा करण्यांत आलेली आहे. याप्रकरणी पंढरपूर पोलीस ठाणे येथे दिनांक २०.०५.२०१७ रोजी अकस्मात जळीत क्र. ०२/२०१७ व अकस्मात मयत क्रमांक ४७/२०१७, सीआरपीसी १७४ प्रमाणे दाखल आहे.

मयताचा पोस्टपार्टम रिपोर्ट प्राप्त झाला असून सदर व्यक्ती १०० टक्के भाजल्याने मयत झाल्याचा अभिप्राय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला आहे. तसेच सदर मयताबाबत त्याच्या जवळच्या नातेवाईकांची काही तक्रार असल्याचे निष्पन्न झाले नाही. सकृतदर्शनी सदर घटना नैसर्गिक आपत्तीअंतर्गत येत नसल्याने मयताच्या नातेवाईकांना मदत देण्यांत आली नाही.

अशा प्रकारची दुर्घटना घडू नये म्हणून व्यापारी वर्गाची बैठक घेऊन रात्रीच्या वेळेस कामगारवर्ग गोदामात, दुकानात राहात असतील तर आग प्रतिबंधक साधने व योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपळगाव बसवंत (ता. निफाड जि.नाशिक ) येथील इस्लामपुरा भागात**
**५ वर्षीय मुलाची हत्या केल्याबाबत**

**(४०) ९१५६१ (०४-०९-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव बसवंत (ता. निफाड जि.नाशिक ) येथील इस्लामपुरा भागात दिनांक २५ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास रात्रीच्या वेळेस ५ वर्षीय मुलाचे लैंगिक शोषण करून नरबळी देण्याच्या उद्देशाने हत्या करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या घटनेची शासनाने सखोल चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) फिर्यादिने दिलेल्या तक्रारीवरून पिंपळगांव पो स्टे येथे भा द वि कलम ३६३,३०२,३४ लैंगिक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ७,८,१६,१७ अन्वये २ आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला व संबधिता विरूध्द मा. विशेष, न्यायालय,जिल्हा व सत्र न्यायालय निफाड येथे दिनांक २५/९/२०१७ रोजी दोषारोप दाखल केलेले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे ) तालुक्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील पोलीस**
**पाटलांच्या रिक्त पदांबाबत**

**(४१) ९१९०३ (०४-०९-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे ) तालुक्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील २५ पोलीस पाटलांची रिक्त पदे गत २ ते १० वर्षापासून भरली गेलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदरची पदे सेवानिवृत्ती, मयत, राजीनामा या नियमीत कारणांमुळे वेळोवेळी रिक्त झालेली आहेत. पोलीस पाटलांच्या रिक्त पदांनुसार बिंदू नामावली नोंदवही प्रमाणित करुन पोलीस पाटील भरतीची प्रक्रिया तातडीने सुरु करण्याबाबत उपविभागीय दंडाधिकारी, धुळे यांना सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

---

**वाढवण बंदराबाबतच्या (ता. डहाणू, जि.पालघर) प्रस्तावित सर्व कामांना पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाने दिलेली स्थगिती**

**(४२) ९१९१९ (०४-०९-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रस्तावित वाढवण बंदराबाबत (ता.डहाणू, जि.पालघर) पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाने नुकत्याच झालेल्या सुनावणीत बंदराच्या सुरु करण्यात आलेल्या प्रस्तावीत सर्व कामांना स्थगिती दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने यासंदर्भात अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :**(१) होय.

(२) पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक २६.०६.१९९१ च्या अधिसूचनेप्रमाणे वाढवण बंदराचा विकास करण्यासाठी व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. वाढवण बंदराच्या विकासाच्या दृष्टीने मिनिस्ट्री ऑफ शिपिंगने पर्यावरण मंत्रालय, वन आणि हवामान विभाग या विभागाकडे सदर अधिसूचनेमध्ये बदल करण्याबाबत विनंती केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भादली (ता.जि.जळगांव) येथील एकाच कुटूंबातील चार व्यक्तींची झालेली हत्या**

**(४३) ९२०८७ (०४-०९-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भादली, (ता.जि.जळगांव ) येथे दिनांक २० मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास एकाच कुटूंबातील चार व्यक्तींची हत्या झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी नशिराबाद पोलीस स्टेशन, भाग-५ येथे गु.र.नं.०८/२०१७ भा.दं.वि.कलम ३०२ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पोलीस पथक स्थापन करण्यात आले आहे. पॉलीग्राफ चाचणी, मानसशास्त्रीय चाचणी इत्यादीद्वारे गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच, सदर गुन्ह्याच्या तपासावर दैनंदिन देखरेख व मार्गदर्शनाबाबत अपर पोलीस अधीक्षक यांना सुचना निर्गमित केलेल्या आहेत. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

---

**मेहरुण (ता.जि.जळगांव) येथील नविद अख्तर पिरजादे या युवकाची झालेली हत्या**

**(४४) ९२०८९ (०४-०९-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहरुण, (ता.जि.जळगांव) येथील नविद अख्तर पिरजादे या १८ वर्षीय युवकाची दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास हत्या घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :** (१), (२) व (३)

सदर प्रकरणी जळगाव एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, भाग-५ येथे गु. र. नं. १५०/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये दि.१६/०६/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपी सध्या मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांडवर असून गुन्ह्याचा तपास चालु आहे.

---

**बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबांसाठी म. फुले जन आरोग्य विमा योजना लागू करण्यास झालेला विलंब**

**(४५) ९२४०९ (०४-०९-२०१७). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेकडे नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबांसाठी म. फुले जन आरोग्य विमा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर योजना दिनांक २ ऑक्टोबर २०१६ रोजीपासून सुरु होणे अपेक्षित होते, मात्र ही योजना अद्यापपर्यंत सुरु झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना कार्यन्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०३-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.०२. जून,२०१६ व उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.२१.०९.२०१६ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांचेकडे नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबासाठी म.फुले जन आरोग्य विमा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.४ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना नवीन स्वरुपात "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" या नावाने दिनांक २ ऑक्टोबर,२०१६ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली होती.सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि.१३ एप्रिल,२०१७ अन्वये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजनेतील तरतुदूसह दिनांक ०१ एप्रिल,२०१७ ते ३० जून,२०१७ या कालावधीकरीता "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या नावाने योजना सुरु ठेवण्यास मान्यता दिली आहे.सदर योजना सुधारीत तरतुदींसह अंमलात आणण्यासाठीची आवश्यक प्रशासकीय कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दिनांक २७.७.२०१७ रोजी नॅशनल इन्शुरन्स कंपनी व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अधिका-यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती.
(४) शासन निर्णयात नमुद केल्यानुसार लाभार्थ्यांची व्दिरुक्ती टाळण्यासाठी महात्मा फुले जन आरोग्य विमा योजनेच्या लाभाकरिता आवश्यक पिवळया,केशरी,अंतोद्य अन्न योजना व अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक बांधकाम कामगार वगळून अन्य बांधकाम कामगारांची यादी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपलब्ध नाही. तसेच,बांधकाम कामगारांना योजनेत समाविष्ट करण्याकरिता संगणक प्रणाली आवश्यक ते बदल करण्यास अवधी लागणार आहे.
वर नमुद केल्यानुसार आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक बाबींची पूर्तता झालेली नसल्याने नोंद्णी जिवीत असलेल्या बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील गायत्री नगरात राहत्या घरात सुरु असलेला बनावट मद्याचा कारखाना

**(४६) ९२५४७ (०४-०९-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील जामनेर रोडवर असलेल्या गायत्री नगरात राहत्या घरात सुरु असलेला बनावट मद्याचा कारखाना दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलीसांनी छापा टाकून उद्ध्वस्त केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६०२१/२०१७ भा.दं.वि. कलम ३२८ सह दारुबंदी कायदा कलम ६५(ई) (ब) (क) (ड) (ई) (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उक्त गुन्ह्यात १ आरोपींस अटक करण्यात आलेली आहे. तसेच, आरोपीकडून गैरकायदा २,५४,०९९/- रुपये किंमतीच्या वेगवेगळ्या मद्याचा साठा, रिकाम्या बाटल्या, ३ कर्मशीयल व १ घरगुती गॅस हंडी, देशी- विदेशी दारु तयार करण्याचे वेगवेगळे रसायन हस्तगत करण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### कै. ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेतील शासनाचे घर बांधणी अग्रीमाबाबत

**(४७) ९३०२० (१२-०९-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या घर बांधणी अग्रीम प्रकरणात गहाणखत नोंदणीकृत करणे अनिवार्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गहाणखत नोंदणीकृत न केल्यामुळे कै. ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेतील प्राध्यापकांना प्रत्यक्ष घर खरेदी न करता आयकराचे लाभ मिळाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार नोंदणीकृत नसलेले गहाणखत स्वीकारल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-११-२०१७) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील दौलत कंपाऊंडमधील गोदामाला आग लागल्याबाबत

**(४८) ९३२०७ (०४-०९-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील दौलत कंपाऊंडमध्ये रसायनांचा साठा करून ठेवलेल्या गोदामाला दिनांक १ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहेत, या आगीत किती वित्तहानी झाली आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) ठाणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नारपोली पोलीस ठाणे हददीतील दौलत कंपाऊंड, राहनाळगांव येथील क्वालीटेक इंडस्ट्रीअल प्रॉडक्ट यांच्या गोडावूनमधील विविध प्रकारचे स्पेअर पार्ट व परच्युटन मधील विविध प्रकारच्या मालमत्तेचे आग लागून नुकसान झाल्याबाबतची घटना दिनांक २ जुलै, २०१७ रोजी घडलेली आहे. सदर ठिकाणी रसायनांचा साठा करुन ठेवण्याचे आढळून आले नाही.

(२) सदर आग ही शॉर्ट सर्किटने लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या आगीमध्ये सुमारे २.३० कोटी रुपयांची वित्तहानी झालेली आहे.

(३) व (४) या प्रकरणी नारपोली पोलीस स्टेशन येथे अकस्मात जळीत रजि. क्र. १६/२०१७ दाखल करण्यांत आला असून पुढील चौकशी चालू आहे. विद्युत निरीक्षक व रासायनिक प्रयोगशाळा यांचेकडील तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तारापूर (जि. पालघर) येथील भाभा अणू संशोधन केंद्र (बीएआरसी) परिसरात ट्रक पेटवून दिल्याबाबत

**(४९) ९३४५९ (०४-०९-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि. पालघर) येथील भाभा अणू संशोधन केंद्र (बीएआरसी) परिसरात माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ट्रक पेटवून दिल्याप्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०१७) :** (१) तारापूर येथील (जि.पालघर) येथील भाभा अणू संशोधन केंद्र (बीएआरसी) परिसरात माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान ट्रक पेटवून दिल्याप्रकरणी संबंधीत पोलीस ठाणेत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर बाबत कोणतीही चौकशी चालू नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गुप्ता एनर्जी प्रा. लि. उसेगाव, (ता. घुग्घूस, जि. चंद्रपूर) कंपनीतील कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(५०) ९३९१२ (०४-०९-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुप्ता एनर्जी प्रा. लि. उसेगाव, (ता. घुग्घूस, जि. चंद्रपूर) कंपनीतील कामगारांच्या मागण्यांसाठी माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सर्व संबंधितांची बैठक घेवून कामगारांच्या मागण्यांसंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशान्वये अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१८-१०-२०१७) :** (१) गुप्ता एनर्जी येथील कामगारांनी ऑक्टोबर २०१६ ते जानेवारी २०१७ पर्यतचे वेतन मिळण्याबाबत दिनांक २७/०१/२०१७ पासून जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूरच्या गेटसमोर आमरण उपोषण केले होते व ते दिनांक ०४/०२/२०१७ रोजी मागे घेतले.

(२) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी व्यवस्थापनाने त्यांच्या कारखान्यात सुरक्षा रक्षकांचे कामाकरीता प्रकल्पग्रस्त कामगारांना प्राधान्य देण्यात यावे तसेच कंपनी बंद करणार असतील तर दिनांक ०६/०२/२०१७ पर्यत कंपनीच्या कामगारांची थकीत देय रक्कमेबाबत प्रस्ताव सादर करावा,असे निर्देश व्यवस्थापनास व सहायक कामगार आयुक्त यांनी थकीत देय रक्कमांची परिगणना कामगार प्रतिनिधीना बोलावून त्यांचे समवेत तपासून घ्यावी,असे निर्देश दिनांक ०४/०२/२०१७ रोजी दिले होते.

(३) सहायक कामगार आयुक्त,चंद्रपूर यांच्या कार्यालयात दिनांक २२/०२/२०१७ ,२४/०३/२०१७ व दिनांक १२/०४/२०१७ रोजी येथे बैठका घेण्यात आल्या.तसेच दिनांक ०७/०४/२०१७ रोजी सदरहू आस्थापनेचे किमान वेतन अधिनियम-१९४८,वेतन प्रदान अधिनियम १९३६ व किमान घरभाडे अधिनियम १९८३ अंतर्गत निरीक्षणे केलेले आहेत.सदरहू निरीक्षणात आढळून आलेल्या त्रुटीची पूर्तता न केल्याने सरकारी कामगार अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक ०५/०६/२०१७ रोजी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, चंद्रपूर येथे खटले दाखल केलेले असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दिनांक ०१/०७/२०१३ पासून सदर कारखान्याचे उत्पादन बंद आहे.कारखान्यात १०-१२ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.कारखाना आर्थिक डबघाईस आलेला असल्याने कामगारांचे ऑक्टोबर २०१६ पासूनचे वेतन थकीत आहे.National Company Law Tribunal,Mumbai यांचेमार्फत इंटोरिअर रिसोल्युशन प्रोफेशनल यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेकडे थकीत वेतन व इतर देणीबाबत अर्ज करण्याकरीता कामगारांना क्षेत्रीय कार्यालयामार्फत दिनांक ०८.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.